वसई-विरार शहर महानगरपालिका

दि.१२/०६/२०२६

वसई-विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाची बोगस डॉक्टराविरोधात कारवाई

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या बोगस वैद्यकीय व्यवसायिकांविरोधात महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. याच अनुषंगाने वालईपाडा, संतोष भवन, नालासोपारा (पूर्व) येथे अवैधरित्या वैद्यकीय व्यवसाय सुरू असल्याची माहिती महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागास प्राप्त झाल्यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्रीम.भक्ती चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत व पोलीस प्रशासनाच्या मदतीने सदर ठिकाणी अवैधरीत्या क्लिनिक चालविणाऱ्या बोगस डॉक्टरविरोधात कारवाई करण्यात आली.

ऋषी हेल्थकेअर ॲण्ड क्लिनिक या नावाने वालईपाडा, संतोष भवन, नालासोपारा (पूर्व) येथे सुरू असलेल्या दवाखान्यात रवींद्र रंजन हा व्यक्ती कोणतीही वैध वैद्यकीय पदवी अथवा नोंदणी नसताना रुग्णांवर उपचार करत असल्याचे तसेच सदर व्यक्ती डॉ. सत्येंद्र पांडे यांच्या बीएचएमएस (BHMS) पदवीचा व नावाचा वापर करून वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याची तक्रार महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागास प्राप्त झाल्यावर याबाबत तात्काळ वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने पोलीस प्रशासनाच्या मदतीने दिनांक ११/०६/२०२६ रोजी रात्री ११.०० वाजता संबंधित क्लिनिकवर छापा टाकून कारवाई केली. कारवाईदरम्यान क्लिनिकमधील वैद्यकीय साहित्य, उपचारासाठी वापरण्यात येणारी उपकरणे, औषधसाठा तसेच इतर संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली.

प्राथमिक तपासात रवींद्र रंजन हा कोणतीही वैद्यकीय पदवी अथवा वैद्यकीय व्यवसाय करण्याचा कायदेशीर अधिकार नसताना नागरिकांवर उपचार करीत असल्याचे आढळून आले. तसेच डॉ. सत्येंद्र पांडे यांनी आपली बीएचएमएस पदवी व ओळख जाणीवपूर्वक वापरण्यास दिल्यामुळे या प्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत पेल्हार पोलीस ठाण्यात रवींद्र रंजन तसेच डॉ. सत्येंद्र पांडे या दोघांविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस प्रशासनामार्फत सुरू असून दोषींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका नागरिकांना आवाहन करते की, उपचार घेण्यापूर्वी संबंधित डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता, नोंदणी क्रमांक व वैद्यकीय व्यवसाय करण्याचा अधिकृत परवाना यांची खातरजमा करावी. कोणत्याही बोगस डॉक्टर, अवैध क्लिनिक अथवा संशयास्पद वैद्यकीय व्यवसायाबाबत माहिती असल्यास ती त्वरित महानगरपालिका अथवा पोलीस प्रशासनाला कळवावी.

नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या बोगस डॉक्टरांविरोधात महानगरपालिकेची कारवाई यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत सांगण्यात आले.